# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**महापालिका सचिव कार्यालय,**
**दिनांक :- २९/०६/२०२६**

## मा. स्थायी समिती सभा
## सभा सुचना क्र. ०६

**प्रति,**
**सन्मा. श्री. / श्रीमती** ------------------------------------------------------------

**स्थायी समिती सदस्य/सदस्या,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ०३/०७/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने**

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०३/०७/२०२६ सभा सुचना क्र. ०६ विषयपत्रिका

| प्रकरण क्र. | विषय |
|---|---|
| ७० | दि. ११/०६/२०२६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **आयुक्तांकडील कामकाज –** |
| ७१ | मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ कामी केलेल्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २(२) अन्वये मंजूरी देणे. |
| ७२ | मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ कामी केलेल्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २(२) अन्वये मंजूरी देणे. |
| ७३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे. महानगर गॅस लि. यांना District Regulating Station (DRS) बसविण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणे. |
| ७४ | मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी आवश्यक अधिकारी / कर्मचारी नियुक्त करणेबाबत. |
| ७५ | लेखा विभागातील विविध रोखवह्यांच्या बँक ताळमेळ घेण्यासाठी, महालेखापाल / स्थानिक निधी लेखापरीक्षा / अंतर्गत लेखापरीक्षण यांचेकडील प्रलंबित आक्षेपांची पूर्तता करणेसाठी शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवा करार पध्दतीने विविक्षित कामासाठी घेणेबाबत. |
| ७६ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभागातील व नगररचना विभागातील सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांच्या नियुक्तीचे नविकरणबाबत. |
| ७७ | नगररचना विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत श्रीम. अमिता मंगेश करलाद, सहा. विधी अधिकारी यांचे नियुक्तीचे नविकरण करणेबाबत. |
| ७८ | महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ मधील व संलग्न कायद्यामधील तरतुदीनुसार केलेल्या कामकाजाचा कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत. |
| ७९ | महानगरपालिकेतील विविध विभागातील कंत्राटदाराचे प्रती महिना किमान वेतन कायदा १९४८, ESIC कायदा १९४८, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२, बोनस कायदा १९६५, कंत्राटी कामगार कायदा १९७० कायद्यामधील तरतुदी अन्वये नेमण्यात आलेल्या सल्लागार यांनी केलेल्या कामकाजास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत. |
| ८० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राकरीता धुळ प्रदुषण नियंत्रण वाहनावरील ०२ वाहनचालक व ०२ मदतनीस (मजुर) यांचे वेतन अदा करणेबाबत. |
| ८१ | कुस्ती प्रशिक्षणासाठी वस्ताद (कोच) या पदास मुदतवाढ मिळणेबाबत. |
| ८२ | औषध फवारणी कर्मचारी पुरवठा करणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची "ड" प्रकरण ५ चे नियम २(२) अन्वये मे. साई सिक्युरिटी अँण्ड फॅसिलीटी मॅनेजमेंट यांना देणे. |
| ८३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या श्वानांचे/मांजराचे मृत शरीराची विल्हेवाट लावणेसाठी पशुसंवर्धन विभागाकरिता निविन रुग्णवाहिका (Mobile Van) महाराष्ट्र शासनाने अधिकृत संकेतस्थळ नाव https://gem.gov.in वरुन थेट खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत. |
| ८४ | मिरारोड (पुर्व) येथील खोजा समाज दफनभुमी (कब्रस्तान) नि:शुल्क दैनंदिन संचलन, देखभाल करणेकरीता निविदेस मान्यता देणेबाबत. |
| ८५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करुन २.५ वर्ष कालावधी करीता निगा देखभाल करणेकामी ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या निविदेस मान्यता मिळणेबाबत. |
| ८६ | मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विविध विभाग व सन्मा. पदाधिकारी यांच्या मार्फत होणाऱ्या विकास कामांची, कार्यक्रमांची जनजागृती करणे, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी करणे व इतर सेवा (IECActivity) घेणेकामी होणाऱ्या कामाचे अवलोकन करणे. |

**दिनांक :- २९/०६/२०२६**

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## माहिती व तंत्रज्ञान विभाग

## मा. स्थायी समिती सभा दि.३/७/२०२६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ७९ ) मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ कामी केलेल्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये मंजूरी देणे (E- २८८४०४९ )**

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता मतदार यादीतील संभाव्य मतदार यांचेबाबत कार्यवाही करण्याकरीता मा.राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ-२०२५/ग्रापंनि/प्र.क्रं.०३/का-८ दि.२९/१०/२०२५ रोजीचे निर्देश प्राप्त झालेले होते. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ कामी मतदार यादीतील दुबार नावांचे (Duplicate Entries) वर्गीकरण आणि अद्ययावत डेटाबेस पुरविणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी दि.३०/१२/२०२५ रोजी दरपत्रक मागविणेस मंजुरी प्राप्त झालेली आहे. मा. आयुक्त सो. यांच्या मंजुरीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ कामी मतदार यादीतील दुबार नावांचे (Duplicate Entries) वर्गीकरण आणि अद्ययावत डेटाबेस पुरविणेबाबत दरपत्रक सादर करणेबाबत दि.३०/१२/२०२५ रोजी नोटीस बोर्डावर व मनपाच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर नोटीस प्रसिध्द करुन दि.०७/०१/२०२६ रोजी दु.१.०० वाजेपर्यंत दरपत्रक मागविणेत आले. त्यानुसार याकामी एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रक धारकांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | M/s Janlook Enterprises यांचे निविदेतील दर रु. | M/s Janlook Enterprises यांचे वाटाघाटीनंतर चे दर रु. | M/s ASCENTech Information Technology Pvt. Ltd. यांचे निविदेतील दर रु. | M/s Innovation IT Solutions यांचे निविदेतील दर रु. |
|---|---|---|---|---|---|
| १. | मतदार यादीतील दुबार नावांचे (Duplicate Entries) वर्गीकरण आणि अद्ययावत डेटाबेस पुरविणेबाबत | ३००००० | २५४२३७ | ३१०००० | ३५०००० |
| | Sub Total | ३००००० | २५४२३७ | ३१०००० | ३५०००० |
| | १८% GST | ५४००० | ४५७६३ | ५५८०० | ६३००० |
| | Total | ३५४००० | ३००००० | ३६५८०० | ४१३००० |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता M/s Janlook Enterprises यांचे दरपत्रकामधील व वाटाघाटीनंतर सादर केलेले दर हे इतर दरपत्रक धारकांच्या M/s ASCENTech Information Technology Pvt. Ltd. व M/s Innovation IT Solutions यांच्या तुलनेत कमी आहेत. सदरकामी रु.२,५४,२३७/- (अधिक GST) खर्च आहे. त्यानुसार M/s Janlook Enterprises यांचेकडून दुबार नावांचे वर्गीकरणाचे काम करुन घेण्यात आले आहे. मात्र, सदरकामी वेळेअभावी दरपत्रकास आवश्यक मान्यता घेणे शक्य झालेले नाही.

तरी मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ कामी मतदार यादीतील दुबार नावांचे (Duplicate Entries) वर्गीकरण आणि अद्ययावत डेटाबेस पुरविणेकामी M/s Janlook Enterprises यांचेकडून केलेल्या कामास व त्याकामी रु.२,५४,२३७/- (अधिक GST) खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ मधील नियम २ (२) अंतर्गत मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

**(प्रणाली घोंगे)**
**उपायुक्त (मा.तं.)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## माहिती व तंत्रज्ञान विभाग

**मा. स्थायी समिती सभा दि. ३ /०/२०२६**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. ( ०२ ) मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ कामी केलेल्या कामास केलेल्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये मंजूरी देणे (E- २८६३८५५)**

मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ कामी अधिकारी/कर्मचारी यांच्या नेमणूका करणे, नोटीस बजावणेस, प्रशिक्षण नियोजन करणेकामी संगणक आज्ञावली पूरवठा करणेकामी निवडणूक विभागाची मागणी प्राप्त झालेली आहे. याकामी Election work Assignment software चे निवडणूक विभागास सादरीकरण झाले. मा.अति.आयुक्त (निवडणूक) व मा.उपायुक्त (निवडणूक) यांनी दि.२०/१२/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार मा.आयुक्त सो.यांचे मंजूरीने Election work Assignment software संगणक आज्ञावली पूरवठा करणेकामी दरपत्रक मागविणेस मा.आयुक्त सो. यांची दि.२९/१२/२०२५ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर दरपत्रकात सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | नग | M/s ASCENTech Information Technology Pvt. Ltd. | M/s NP Infoserve Technologies Pvt. Ltd. | M/s Arcturus Softtech Pvt. Ltd. |
|---|---|---|---|---|---|
| १. | **Design, Development, Customization & Implementation of Election work Assignment software** | १ | १,६९,४९२ | २,००,००० | २,२५,००० |
| **Total** | | | **१,६९,४९२ (अधिक GST)** | **२,००,००० (अधिक GST)** | **२,२५,००० (अधिक GST)** |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता M/s ASCENTech Information Technology Pvt. Ltd. यांचे दरपत्रकामधील सादर केलेले दर हे इतर दरपत्रक धारकांच्या M/s NP Infoserve Technologies Pvt. Ltd व M/s Arcturus Softtech Pvt. Ltd. यांच्या तुलनेत कमी आहेत. सदरकामी रु.१,६९,४९२/- ( अधिक GST ) खर्च आहे. त्यानुसार M/s ASCENTech Information Technology Pvt. Ltd. यांचेकडून Design, Development, Customization & Implementation of Election work Assignment software चे काम करुन घेण्यात आले आहे. मात्र, सदरकामी वेळेअभावी दरपत्रकास कार्यादेश प्रदान करणे शक्य झालेले नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ कामी Election work Assignment software पूरवठा करणेकामी M/s ASCENTech Information Technology Pvt. Ltd. यांचेकडून केलेल्या कामास व त्याकामी रु.१,६९,४९२/- (अधिक GST) खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ मधील नियम २ (२) **अंतर्गत कार्योत्तर मंजूरी मिळणेस** शिफारस आहे.

**(स्वप्निल सावंत)**
**उपायुक्त (मा.तं.)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा.स्थायी समिती सभा दि. ३ / ०७ /२०२६**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( ०३ )** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे.महानगर गॅस लि. यांना District Regulating Station (DRS) बसविण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महानगर गॅस लि. यांच्यामार्फत गॅस पुरवठा केला जाते. PNG (Piped Natural Gas) जास्तीत जास्त पुरवणेसाठी नेटवर्क उभारणे करीता जलद गतीने परवानग्या दयावयाचा आहे. सदर कामांतर्गत महानगर गॅस लि. यांनी Distrrict Regulating Station (DRS) बसविण्यसाठी मोजमाप ५.०० मी. X ६.०० मी. एवढी जागा उपलब्ध करुन देणेसाठी खालील ठिकाणी जागा मागणी केली आहे.

| अ.क्र. | ठिकाण |
|---|---|
| १. | मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.२४५ पार्कींग जागा |
| २. | मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.२६१ उदयान जागा |
| ३. | भाईंदर (प.) आरक्षण क्र.५६ सी मैदान |

शासन निर्णय क्र.गॅविसू-२०२६/प्र.क्र.११६/नवि-२० दि.२७ मार्च २०२६ अन्वये केंद्र शासनाच्या निर्देशानूसार राज्यभरात City Gas Distribution (CGD) नेटवर्कच्या जलद व वेगवान विस्ताराकरीता भारत सरकारने PNG (Piped Natural Gas) जोडण्यांचे निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने मे. महानगर गॅस लि. यांना वरील नमूद ठिकाणी स्वखर्चान Distrrict Regulating Station (DRS) बसविण्यासाठी ५.०० मी. X ६.०० मी. एवढी जागा उपलब्ध करुन देणेची मागणी केली आहे. सदर जागा उपलब्ध करुन दिल्यास त्यांना जलदगतीने PNG (Piped Natural Gas) पुरवठा करता येणार आहे.

Piped Natural Gas जलदगतीने पुरवठा करणेसाठी सर्वोतोपरी मदत करण्याचे शासनाच्या सुचना असल्याने वरील जागा व इतर आवश्यक जागा चालू बाजार भावानुसार भाडे तत्वावर तीन वर्ष मुदतीसाठी तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करणेकरीता मान्यता देणेस शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**प्र.शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

PC-09/2026-27/DK/SG-1

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आस्थापना विभाग

## मा.स्थायी समिती सभा दि. ३ / ६ /2026

## (गोषवारा)

प्रकरण क्र. ६४ :- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचरी नियुक्त करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या 74 डिझेल बसकरीता Gross Cost Contract (GCC) तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करण्यात आलेला आहे. तसेच 57 e-Buses देखील Gross Cost Contract (GCC) तत्वावर पुरवठा करून चालविणेसाठी स्वतंत्र बस ऑपरेटर नियुक्त करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे Pm e-Bus sewa प्रकल्पाअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमास 100 बस मंजुर झाल्या आहेत. सदर बसदेखील Gross Cost Contract (GCC) तत्वावर चालविण्यात येणार आहेत. सदर 100 बससाठीदेखील केंद्र शासनामार्फत स्वतंत्र बस ऑपरेटर नियुक्त केलेला आहे.

परिवहन उपक्रमाच्या संपूर्ण बसेस Gross Cost Contract (GCC) तत्वावर चालविण्यात येणार असल्याने या सर्व बसेसचे तिकीट संकलनाची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. त्यासाठी स्वतंत्र एजन्सी नियुक्त करण्यात आली असून तिकीटाचे उत्पन्न महानगरपालिकडे जमा होत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी सद्या घोडबंदर येथे बसडेपो, वाहतूक कार्यालय इमारत, कार्यशाळा इमारत यासह उभारण्यात आलेला असून सदर डेपोलगत तसेच कनकिया येथे असे आणखी दोन बसडेपोचे बांधकाम सुरु आहे.

वरील नमुदप्रमाणे वेगवेगळे 03 बस ऑपरेटर, तिकीट संकलन एजन्सी यांचे कामकाजावर, बस प्रवर्तनावर देखरेख व नियंत्रण ठेवणेसाठी तांत्रिक, प्रशासकीय व लेखा विषयक अधिकारी/ कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहे. सदयस्थितीत परीवहन उपक्रमामध्ये 01 पद ITS Officer (ठोक मानधनावर) घेतलेले असुन एक कनिष्ठ अभियंता (स्थायी) कार्यरत आहेत.

बस डेपोतील दैनंदिन कामाचे व्यवस्थापन करणेसाठी तांत्रिक Depot Manager (डेपो मॅनेजर) पदाची आवश्यकता आहे. तसेच परिवहन विभागामध्ये उत्पन्न, खर्च, ठेकेदारांचे देयके इत्यादी सर्व वित्तीय व्यवहारांचे नियोजन व लेखाजोखा सुयोग्यरीत्या करण्यासाठी Accountant (लेखापाल) पदाची आवश्यकता आहे. सबब, परिवहन सेवेचा वाढता व्याप पाहता, अतिरिक्त तांत्रिक, लेखाविषयक व प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी आवश्यक आहेत. मात्र, महानगरपालिकेचे आकृतीबंधामध्ये आवश्यक सर्व पदे मंजूर नसल्याने, सध्या मंजूर असलेल्या पदांपैकी खालील पदांवर तुर्त ठोक मानधनावर अधिकारी/कर्मचारी नियुक्त करणेकामी करणे योग्य होईल.

| अ.क्र. | पदनाम | ठोक मानधन(रू.) | दि.26/02/2019 आकृतीबंधा नुसार मंजूर पदाची संख्या | वयोमर्यादा | तुर्त आवश्यक पदसंख्या | कामाचे स्वरुप | किमान शैक्षणिक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Depot Manager (डेपो मॅनेजर) | 45,000/- | 2 | किमान 18 वर्षे ते कमाल 45 वर्षे | 1 | बस डेपोतील दैनंदिन कामाचे व्यवस्थापन, बस डेपोतील बस दुरुस्ती वेळापत्रक इत्यादी कामांचे दैनंदिन व्यवस्थापन करणे, बस चालक, मेकॅनिक सुपरवायझर इत्यादी कर्मचाऱ्यांचे पर्यवेक्षण करणे व त्यांच्यामध्ये समन्वय साधणे, बसेसची नियमितपणे योग्य रीतीने देखभाल दुरुस्ती केली जाते याची पाहणी करणे, प्रवाशांना उच्चस्तरीय परिवहन सेवा प्रदा | मान्यता प्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/ ऑटोमोबाईल अथवा तत्सम समकक्ष अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्तीर्ण. किमान 50 बसताफा असलेल्या परिवहन उपक्रमामध्ये जड वाहनांच्या मेंटेनन्स संबं |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | न करण्यासाठी आवश्यक प्रणाली सुनिश्चित करणे, प्रवासी व कर्मचारी यांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक सुरक्षा उपायांची अंमलबजावणीकरणे, इंधन कार्यक्षमता, दुरुस्ती देखभाल रेकॉर्ड, कामगिरी निर्देशकांचे निरीक्षण करणे, आपत्कालीन परिस्थिती, अपघात व बिघाड कामी करण्यासाठी तसेच प्रवाशांची सुरक्षितता सुरक्षित करण्यासाठी आवश्यक कार्यप्रणाली राबविणे. | धित डेपो मॅनेजर ऑपरेशन मॅनेजर, मेंटेनन्स मॅनेजर, मेंटेनन्स अभियंता, वा तत्सम कामाचा किमान 05 वर्षाचा अनुभव असावा.<br>मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| 2 | Accountant(लेखापाल) | 35,000/- | 7 | किमान 18 वर्षे ते कमाल 45 वर्षे | 1 | या पदावर नियुक्त कर्मचाऱ्यास वाहतूक विभागाचे आर्थिक निरीक्षण अचूक पाहणे, अहवाल सुनिश्चित करणे, बजेट व्यवस्थापन, विभागासाठी अंदाजपत्रक आणि आर्थिक नियोजन व्यवस्थापित करणे. अनुपालन आर्थिक नियम आणि मानकांचे पालन करणे आवश्यक आहे. | 1. वाणिज्य शाखेतील पदवी.<br>2. MS-CIT<br>3. MS-Excel<br>4. Tally<br>5. मराठी टायपिंग 30W.P.M<br>6. इंग्रजी टायपिंग 40W.P.M<br>7. कोणत्याही परिवहन उपक्रमात लेखा विषयक काम केल्याचा किमान 05 वर्षाचा अनुभव असावा. |

सबब, परिवहन उपक्रमांची तातडीची आवश्यक पाहता, उक्त नमुद पदांकरीता भरती प्रक्रिया पूर्ण होऊन कायमस्वरुपी अधिकारी/कर्मचारी नियुक्त होईपर्यंत महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम 53 (3) नुसार आस्थापना विभागामार्फत सदर पदांवर ठोक मानधनावर 6-6 महिने मुदतीने अधिकारी/कर्मचारी नियुक्ती करणे मा.आयुक्त महोदय यांनी दि.14/06/2026 रोजी मंजूरी दिलेली आहे. सदर दोन पदांकरीता मासिक रक्कम रू.80,000/- प्रमाणे सहा महिन्यांसाठी रक्कम रु.4,80,000/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी त्यांच्या वेतनाकरीता रक्कम रू.4,80,000/- इतक्या होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.23/06/2026 वेळ 3.2.40
रजिस्टर नोंद अ.क्र. 48 वर्ष 26-27
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

## <u>आस्थापना विभाग</u>

## मा.स्थायी समिती सभा दि. 3 / ७ /2026

## (गोषवारा)

प्रकरण क्र. ७४ :- लेखा विभागातील विविध रोखवहयांच्या बँक ताळमेळ घेण्यासाठी, महालेखापाल/स्थानिक निधी लेखापरीक्षा/अंतर्गत लेखापरीक्षण यांचेकडील प्रलंबित आक्षेपांची पूर्तता करणेसाठी शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवा करार पध्दतीने विविक्षित कामासाठी घेणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखा विभागात शासन नगरविकास विभाग निर्णय क्र. निमाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26/02/2019 नुसार मंजूर आकृतीबंधानुसार 18 पदे मंजूर आहेत. दि.17/12/2016 च्या शासन निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार करार पध्दतीने नियुक्ती देताना कार्यालयातील आस्थापनेवरील एकुण मंजूर पदसंख्येच्या जास्तीत जास्त 10% इतके अधिकाऱ्यांना करार पध्दतीने नियुक्ती देता येईल, असे नमुद आहे.

सद्यस्थितीत लेखा विभागातील रोखवहयांचा बँक ताळमेळ सन 2018-19 पासून प्रलंबित असल्याने सदर बँक ताळमेळ पूर्ण करणेसाठी व महालेखापाल/स्थानिक निधी लेखापरीक्षा/अंतर्गत लेखापरिक्षण यांचेकडील प्रलंबित आक्षेपांची पूर्तता करणेसाठी 2 सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची लेखा विभागाकरीता आवश्यकता आहे. सदर सेवाकरारपध्दतीने लेखा अधिकारी /सहा.लेखा अधिकारी नियुक्त करणेकरीता आवश्यक अर्हता व वयोमर्यादा खालीलप्रमाणे :-

| सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे संवर्ग | पदनाम | अनुभव | वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| लेखा अधिकारी /सहा.लेखा अधिकारी | लेखा अधिकारी/सहा. अधिकारी (सेवानिवृत्त) | शासकीय/निमशासकीय कार्यालय तसेच महानगरपालिकेच्या सेवेतील ब वर्ग सहा लेखा अधिकारी/ लेखा अधिकारी या पदावर काम केल्याचा अनुभव असावा. | वयाची मर्यादा ६५ वर्षापेक्षा अधिक असु नये. |

माहे 2025-26 या आर्थिक वर्षात "आस्थापना विभाग-आस्थायी आस्थापना" या लेखाशिर्षाअंतर्गत सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या मासिक पारिश्रमिक व भत्त्यांकरीता होणाऱ्या खर्चास तरतूद करण्यात आलेली आहे.

लेखा विभागाची आवश्यकता पाहता 02 सेवानिवृत्त लेखा अधिकाऱ्यांची 01 वर्षाकरीता सेवाकरार पध्दतीने जाहीरात प्रसिध्द करुन (Walk in Interview) द्वारे नियुक्ती करणेकामी तसेच त्यांच्या मासिक पारिश्रमिक व भत्त्यांकरीता होणाऱ्या खर्चास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

सबब लेखा विभागाची आवश्यकता पाहता 2 सेवानिवृत्त लेखा अधिकाऱ्यांची 01 वर्षाकरीता सेवाकरार पध्दतीने जाहीरात प्रसिध्द करुन (Walk in Interview) द्वारे नियुक्ती करण्यास तसेच त्यांच्या मासिक पारिश्रमिक व भत्त्यांकरीता होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आस्थापना विभाग

### मा.स्थायी समिती सभा दि. ३ / ७ /2026

### (गोषवारा)

प्रकरण क्र.७६ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभागातील व नगररचना विभागातील सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांच्या नियुक्तीचे नविकरणबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभागात व नगररचना विभागात खालील कार्यरत सेवानिवृत्त लेखापरीक्षण अधिकाऱ्यांपैकी अनु.क्र.01 ते 03 वरील अधिकारी यांना दि.15/07/2024 रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती देण्यात आली असून मा.प्रशासकीय सभा दि.01/08/2025 ठराव क्र.193 अन्वये त्यांच्या नियुक्तीचे नविकरण करण्यात आलेले आहे. तसेच अनु.क्र.04 वरील अधिकारी यांना दि.14/07/2025 रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | सेवानिृत्त लेखापरीक्षण अधिकाऱ्याचे नाव | मुदत संपुष्टात येत असल्याचा दिनांक |
|---|---|---|
| 1. | श्री. प्रविण म. वैवुडे | दि.11/06/2026 |
| 2. | श्री. कांतीनाथ विष्णु संखे | दि.11/06/2026 |
| 3. | श्री. सुरेश केशव घोलप | दि.11/06/2026 |
| 4. | श्री.सुभाष आनंदगिरी गोसावी | दि.13/07/2026 |

सदर लेखापरिक्षण अधिकारी यांच्या नियुक्तीची मुदत दि.10/06/2025 रोजी संपुष्टात आली असल्याने मा.प्रशासकीय सभा दि.01/08/2025 ठराव क्र.193 अन्वये त्यांना दि.11/06/2025 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन 12/06/2025 ते दि.11/06/2026 रोजी पर्यंत 01 वर्षाकरीता नियुक्तीचे नविकरण करण्यात आले होते. त्याअनुषंगाने अ.क्र.01 ते 03 यांची मुदत दि.11/06/2026 रोजी संपुष्टात येणार आहे.

1) सन 2022-23 या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखापरीक्षण अहवाल पूर्ण केले असून अहवाल निर्गमित करण्यात आला आहे. 2) सद्यस्थितीत सन 2023-24 व 2024-25 या आर्थिक वर्षाच्या अंतर्गत लेखापरीक्षणाचे काम सुरु असून ते पूर्ण करुन अहवाल प्रसिध्द करण्याचे काम प्रलंबित आहे. सदर काम पूर्ण करण्यासाठी कार्यरत असलेले सेवानिवृत्त लेखापरीक्षा अधिकारी श्री.कांतीनाथ विष्णू संख्ये, श्री.सुरेश केशव घोलप तसेच श्री. सुभाष आनंदगिरी गोसावी यांची आवश्यकता असल्याने त्यांची मुदतवाढ करणेबाबत लेखारिक्षण विभागाने दि.04/05/2026 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच विकास परवानगी देताना आवश्यक अधिमुल्य शुल्क विकास शुल्क इ. शुल्कांचा भरणे करून घेण्याची कार्यवाही करण्यात येते त्यामुळे विभागाकडील कामकाजासाठी श्री.प्रविण म. वैवुडे यांची नगररचना विभागास आवश्यकता असल्याने त्यांची मुदतवाढ करणेबाबत दि.13/05/2025 रोजीच्या पत्रान्वये नगररचना विभागाने विनंती केलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सेवा निवृत्त लेखापरीक्षण अधिकाऱ्यांसाठी सन 2026-27 चा आर्थिक वर्षाकरीता खर्च "आस्थापना विभाग - अस्थायी आस्थापना" या लेखाशिर्षात रु.1.75 लाख इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. अ.क्र.01 ते 04 वरील लेखापरिक्षण अधिकारी यांच्या वेतनाकरीता अंदाजित मासिक खर्च रु.2,92,250/- इतका असुन वार्षिक रु.35,07,000/- (अक्षरी- पस्तीस लाख सात हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण व नगररचना विभागामध्ये सेवाकरार पध्दतीने कार्यरत सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी 1) श्री.प्रविण म. वैवुडे 2) श्री.कांतीनाथ विष्णु संखे व 3) श्री.सुरेश केशव घोलप यांची मुदत दि.11/06/2026 रोजी संपुष्टात येणार असल्याने त्यांना

दि.12/06/2026 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन 13/06/2026 व दि.14/06/2026 रोजी सुट्टी असल्याने दि.15/06/2026 ते दि.14/06/2027 पर्यंत 01 वर्षाकरीता व 4) श्री.सुभाष आनंदगिरी गोसावी यांची मुदत दि.13/07/2026 रोजी संपुष्टात येणार असल्याने त्यांना दि.14/07/2026 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन 15/07/2026 ते दि.14/07/2027 रोजी पर्यंत मुदतीचे नविकरण करणेस तसेच अ.क्र.01 ते 04 वरील लेखापरिक्षण अधिकारी यांच्या 01 वर्षाच्या वेतनाकरीता अंदाजित रक्कम रु.35,07,000/- इतक्या येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

~~मा. महासभा~~ / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि २३/०६/२०२६ वेळ सायं ०६ = ४५ वा
रजिस्टर नोंद अ. क्र. ५८ वर्ष २०२६-२६

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आस्थापना विभाग

**मा.स्थायी समिती सभा दि. 3 / 6 /2026**

**(गोषवारा)**

प्रकरण क्र. 66 :- नगररचना विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत श्रीम.अमिता मंगेश करलाद, सहा.विधी अधिकारी यांचे नियुक्तीचे नविकरण करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये अतिक्रमण व अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या कायद्याविषयक बाबी हातळण्यासाठी अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकरीता व नगररचना विभागाकडून वारंवार विकासकाच्या कामासाठी कयदेशीरबाबी पडताळणी करणेकरीता तसेच समुह विकास योजना (कल्स्टर) योजनेअंतर्गत न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात रु.40,000/- ठोक मानधनावर श्रीम. अमिता मंगेश करलाद यांची सहा.विधी अधिकारी या पदावर दि.05/12/2023 रोजीच्या आदेशान्वये 06 महिन्याकरीता नियुक्ती करण्यात आलेली होती.

मा.प्रशासकीय सभा दि.10/12/2025, ठराव क्र.347 अन्वये दि.10/12/2025 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.11/12/2025 ते दि.10/06/2026 पर्यंत 06 महिन्यांकरीता नियुक्तीचे नविकरण करण्यात आले होते. सदरची मुदत दि.10/06/2026 रोजी संपुष्टात येत आहे. श्रीम. अमिता मंगेश करलाद, सहा. विधी अधिकारी यांची नगररचना विभागास आवश्यकता असल्याने त्यांच्या नियुक्तीचे नविकरण करणेबाबत दि.05/05/2026 रोजीच्या पत्रान्वये नगरचना विभागाने कळविले आहे.

सदर सहा.विधी अधिकारी यांचे वेतन "आस्थापना विभाग-अस्थायी आस्थापना " या लेखाशिर्षकातून अदा करण्यात येते. त्यांच्या 06 महिन्याच्या वेतनाकरीता रू.2,40,000/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यानुसार श्रीम.अमिता मंगेश करलाद, सहा.विधी अधिकारी यांना दि.11/06/2026 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.12/06/2026 ते दि.11/12/2026 पर्यंत पुढील 06 महिन्यांसाठी नियुक्तीचे नविकरण करणेकरीता तसेच त्यांच्या 06 महिन्यांच्या वेतनाकरीता रू.2,40,000/- इतक्या येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ.सचिन बांगर)
उप आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आस्थापना विभाग

## मा.स्थायी समिती सभा दि. 3 / 6 /2026

## (गोषवारा)

प्रकरण क्र. 06 :- महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 मधील व संलग्न कायदयामधील तरतुदीनुसार केलेल्या कामकाजाचा कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचा-यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 मधील व संलग्न कायदयामधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीकरीता सल्लागार नेमणेबाबत दि.04/01/2022 रोजी जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदर निविदेनुसार मे.वेदांत इंटरप्राईजेस (श्री.अनंत चौधरी) यांना 01 वर्षाकरीता दि.24/02/2022 रोजी कार्यादेश देण्यात आलेला होता. सदर कामकाजाची दि.23/02/2023 मुदत संपुष्टात आल्याने त्यांना दि.24/02/2023 रोजी तांत्रिक खंड देऊन तसेच दि.25/02/2023 व दि.26/02/2023 रोजी शासकीय सुट्टी असल्याने दि.27/02/2023 ते दि.26/02/2024 पर्यंत 01 वर्षाकरीता मे.वेदांत एंटरप्रायजेस (अनंत चौधरी) यांना मुदतवाढ कार्यादेश देण्यात आलेला आहे. मे. वेदांत एंटरप्रायजेस यांना सदर कामकाजाकरीता रु.54,000/- इतके होत व त्याप्रमाणे वार्षिक खर्च रु.6,48,000/- इतके आहे.

महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 मधील व संलग्न कायदयामधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीकरीता सल्लागार यांची दि.26/02/2024 रोजी मुदत संपुष्टात आली होती. तद्नंतर दि.28/02/2024 ते दि.30/11/2025 पर्यंत मे.वेदांत इंटरप्राईजेस (श्री.अनंत चौधरी) यांना मुदतवाढ देण्यात आली नव्हती. परंतु सदर कामकाजाची निकड पाहता मे.वेदांत एंटरप्रायजेस यांना सदर कालावधीत सर्व विभागाचे कामकाज अस्थायी संगणक चालक व लघुलेखक, ऑडीट लिपीक व वैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांचे ई.पी.एफ. चे चलन भरणा करणे तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेत ठोक मानधनावरील अस्थायी कर्मचारी यांचे प्रती महिना रेकॉर्ड तयार करणे, तसेच वेळोवेळी होणाऱ्या ई.पी.एफ. बाबतच्या बैठकीला महानगरपालिकेमार्फत उपस्थित रहाणे, केंद्रीय कामगार ई.पी.एफ. ॲण्ड एम.पी. 1952 च्या अंतर्गत येणाऱ्या नोटीसांना उत्तर देणे. (ठोक मानधनावरील कर्मचाऱ्यांबाबत) इ. कामकाज केलेले आहे.

सबब दि.28/02/2024 ते दि.30/11/2025 या कालावधीकरीता केलेल्या कामकाजाच्या अनुषंगाने अदा करावयाचे देयकाचा तपशिल तसेच मे.वेदांत एंटरप्रायजेस यांना एकुण अदा केलेल्या देयकाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | कालावधी | अदा केलेली रक्कम | अदा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | दि.24/02/2022 ते दि.23/02/2023 | रु.6,48,000/- | - |
| 2. | दि.27/02/2023 ते दि.26/02/2024 | रु.6,48,000/- | - |
| 3. | दि.28/02/2024 ते दि.30/11/2025 | - | रु.11,34,000/- (रु.54,000 × 21 महिने) |

सबब वरीलप्रमाणे दि.24/02/2022 ते दि.26/02/2024 या कालावधीत केलेल्या कामकाजाचे रु.12,96,000/- इतके देयक अदा केलेले आहे व दि.28/02/2024 ते दि.30/11/2025 या कालावधीत त्यांनी कामकाज केलेले आहे. परंतु त्यांची मुदत दि.26/02/2024 रोजी संपुष्टात आल्याने पुढील कालावधीकरीता

कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक आहे. दि.28/02/2024 ते दि.30/11/2025 या कालावधीचे देयक रक्कम रु.11,34,000/- अदा करावयाचे असून मे.वेदांत इंटरप्राईजेस (श्री.अनंत चौधरी) यांनी सदर कालावधीत केलेल्या कामकाजाच्या देयकाची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने मा.आयुक्त महोदय यांनी उक्त खर्चास दि.21/05/2026 रोजी मंजूरी दिलेली आहे. तरी सदर खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.२४/०६/२०२६ वेळ सायं.४.३५वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. ६० वर्ष २०२६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आस्थापना विभाग

## मा.स्थायी समिती सभा दि. 3 / 6 /2026

## (गोषवारा)

प्रकरण क्र. 68 :- महानगरपालिकेतील विविध विभागातील कंत्राटदारांचे प्रती महिना किमान वेतन कायदा 1948, ESIC कायदा 1948, कर्मचारी भविष्य निधी कायदा 1952, बोनस कायदा 1965, कंत्राटी कामगार कायदा 1970 कायद्यामधील तरतुदी अन्वये नेमण्यात आलेल्या सल्लागार यांनी केलेल्या कामाकाजास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत...

महापालिकेतील विविध विभागातील कंत्राटदारांचे प्रती महिना किमान वेतन कायदा 1948, ESIC कायदा 1948, कर्मचारी भविष्य निधी कायदा 1952, बोनस कायदा 1965, कंत्राटी कामगार कायदा 1970 कायदयामधील तरतुदी अन्वये सल्लागार नेमणेबाबत संदर्भ क्र.1 अन्वये जाहिर निविदा सूचना मागविण्यात आलेली होती.

सदर निविदेनुसार मे.वेदांत इंटरप्राईजेस (श्री.अनंत चौधरी) यांना 11 महिन्याकरीता संदर्भ क्र.03 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता. तसेच मे.वेदांत इंटरप्राईजेस (श्री.अनंत चौधरी) यांच्या दराला 11 महिन्याकरीता होणाऱ्या खर्चाबाबतच्या प्रतीवृत्तास मा.प्रशासकीय सभा दि.12/03/2024, ठराव क्र.442 अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदरची मुदत दि.13/02/2025 रोजी संपुष्टात आलेली आहे.

मे.वेदांत इंटरप्राईजेस या सल्लागाराचे मासिक मानधन रु.75,000/- असुन वार्षिक खर्च रु.9,00,000/- (अक्षरी रु. नऊ लाख मात्र) इतका खर्च आहे.

महानगरपालिकेतील विविध विभागातील कंत्राटदारांचे प्रती महिना किमान वेतन कायदा 1948, ESIC कायदा 1948, कर्मचारी भविष्य निधी कायदा 1952, बोनस कायदा 1965, कंत्राटी कामगार कायदा 1970 कायद्यामधील तरतुदी अन्वये नेमण्यात आलेल्या सल्लागार यांची दि.13/02/2025 रोजी मुदत संपुष्टात आली होती. तद्नंतर दि.14/02/2025 ते दि.30/11/2025 पर्यंत यांना मुदतवाढ देण्यात आलेली नव्हती. परंतु सदर कामाची निकड पाहता मे.वेदांत एंटरप्रायजेस यांनी सदर कालावधीत सर्व विभागाचे केंद्रीय कामगार ई.पी.एफ. अॅण्ड एम.पी. 1952 च्या कायदयानुसार व त्यात होणाऱ्या बदलानुसार कार्यवाही करणे. (ठोक मानधनावरील कर्मचाऱ्यांबाबत) महापालिकेतील विविध विभागातील कंत्राटदारांचे प्रती महिना किमान वेतन कायदा 1948, ESIC कायदा 1948, कर्मचारी भविष्य निधी कायदा 1952, बोनस कायदा 1965, कंत्राटी कामगार कायदा 1970 कायदया इ. कामकाज केलेले आहे.

सबब दि.14/02/2025 ते दि.30/11/2025 या कालावधीकरीता केलेल्या कामकाजाच्या अनुषंगाने अदा करावयाचे देयकाचा तपशिल तसेच मे.वेदांत एंटरप्रायजेस यांना एकुण अदा केलेल्या देयकाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | कालावधी | अदा केलेली रक्कम | अदा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| | दि.14/03/2024 ते दि.13/02/2025 | रु.8,25,000/- | - |
| | दि.14/02/2025 ते दि.30/11/2025 | - | (दि.14/02/2025 ते दि.28/02/2025) पर्यंत रु.37,492/- + (दि.01/03/2025 ते दि.30/11/2025) (75000 × 09 महिने) रु.6,75,000/- = (रु.7,12,492) |
| | | | |

सबब वरीलप्रमाणे दि.14/03/2024 ते दि.13/02/2025 या कालावधीत केलेल्या कामकाजाचे रु.8,25,000/- इतके देयक अदा केलेले आहे व दि.14/02/2025 ते दि.30/11/2025 या कालावधीत त्यांनी कामकाज केलेले आहे. परंतु त्यांची मुदत दि.13/02/2025 रोजी संपुष्टात आल्याने पुढील कालावधीकरीता

कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक आहे. दि.14/02/2025 ते दि.30/11/2025 या कालावधीचे देयक रक्कम रु.7,12,492/- अदा करावयाचे असून मे.वेदांत इंटरप्राईजेस (श्री.अनंत चौधरी) यांनी सदर कालावधीत केलेल्या कामकाजाच्या देयकाची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने मा.आयुक्त महोदय यांनी उक्त खर्चास दि.12/06/2026 रोजी मंजूरी दिलेली आहे. सदर खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 28 /06 /2026 वेळ सायं ४:३० वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. 69 वर्ष 2026-26

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## अग्निशमन विभाग

## मा. स्थायी समिती सभा दि. ३ / ८ / २०२६

## (गोषवारा)

| प्रकरण क्र. ८० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राकरीता धुळ प्रदुषण नियंत्रण वाहनावरील ०२ वाहनचालक व ०२ मदतनीस (मजुर) यांचे वेतन अदा करणेबाबत. ( रु. ११,७५,१५२ /-) |
|---|---|

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राकरीता धुळ प्रदुषण नियंत्रण वाहन ( मिस्ट स्प्रे मशीन) वाहन क्र. एम एच ०४ - एल ई- ८४९२ व वाहन क्र. एम एच ०४ - एल ई- ८४९३ अशी एकुण ०२ नग वाहने महानगरपालिका, पर्यावरण विभागाकडून अग्निशमन विभागास वर्ग करण्यात आली असुन सदर यंत्रणा कार्यान्वित राहणेकरीता सदर वाहनावर वाहनचालक व मदतनीस असणे आवश्यक आहे.

| अ . क्र | वाहन क्र. | आवश्यक वाहनचालक | आवश्यक मदतनीस | आवश्यक एकुण मनुष्यबळ |
|---|---|---|---|---|
| ०१ | एम. एच ०४ एल ई – ८४९२ | ०१ | ०१ | ०२ |
| ०२ | एम.एच ०४ एल. ई – ८४९३ | ०१ | ०१ | ०२ |
| | एकुण | | | ०४ |

वरील वाहनावर काम करणेकरीता पर्यावरण विभागाकडील कार्यरत असणारे प्रशिक्षित वाहनचालक व मदतनीस ठेवणे आवश्यक आहे. या करिता अग्निशमन विभागास वाहनचालक पुरवठा करीत असलेले कंत्राटदार मे. सिक्युअर १ सिक्युअर सर्व्हिस यांना रु.२७, ३२८/- या मंजुर दराने वाहनचालक पुरवठाकरणेस तसेच मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स यांना रु.२६,३००/- या मंजुर दराने मदतनीस पुरवठाकरणेस कार्यादेश देण्यात यावा. वरील तक्त्यात नमुद केलेनुसार प्रतिवाहन ०१ वाहनचालकाकरीता रु. २७,३२८/- या प्रतिमाह मंजुर दराने ०२ वाहनचालका करीता एकुण रु. ५४,६५६/- इतका प्रतिमाह खर्च अपेक्षीत आहे. तसेच ०२ मदतनीस करीता रु. २६,३००/- या प्रतिमाह मंजुर दराने एकूण रु. ५२,६००/- इतका प्रतिमाह खर्च अपेक्षीत आहे. असा आवश्यक एकुण ०४ मनुष्यबळाकरिता एकुण रु. १,०६,८३२ /- इतका खर्च अपेक्षित असुन सदर कामी ११ महिन्यांकरीता एकुण ११,७५,१५२ /- इतका खर्च येणार आहे.

सन २०२६ -२७ या आर्थिक वर्षात अग्निशमन विभागाच्या " अस्थायी आस्थापना " या लेखाशिर्षाअंतर्गत रु. १,२०० लाख इतकी तरतुद करण्यात आली आहे. सदरचा खर्च अग्निशमन विभागाच्या " **अस्थायी आस्थापना**" या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात येईल.

**तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राकरीता धुळ प्रदुषण नियंत्रण वाहने कार्यान्वित राहणेकरीता कंत्राटदार मे. सिक्युअर १ सिक्युअर सर्व्हिस यांना ०२ वाहनचालक पुरवठा करणेस व मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स यांना ०२ मदतनीस पुरवठा करणेकामी कार्यादेश देणेस व त्यांच्या वेतनावर होणाऱ्या एकुण रु. ११,७५,१५२ /- इतक्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.**

**(डॉ. सचिन बांगर)**
**उप – आयुक्त (मुख्यालय)**
**अग्निशमन विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्यकार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)**
**ता.जि.ठाणे 401101**
**क्रीडा विभाग**
**मा. स्थायी समिती सभा दि. 3 / 6 /2026**
**// गोषवारा //**

**प्रकरण क्रं. ८९ :- कुस्ती प्रशिक्षणासाठी वस्ताद (कोच) या पदास मुदतवाढ मिळणेबाबत**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कुस्तीपटुंना शास्त्रशुध्द् प्रशिक्षण देण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (3) नुसार सहा महिन्यांकरीता संदर्भिय मा. आयुक्त् सो. यांच्या अधिकारामध्ये श्री. वैभव रुपचंद माने यांची नेमणूक करण्यात आलेली होती. सदर नेमणूक ही दि.17/12/2025 ते दि.16/06/2026 पर्यंत सहा महिन्यांकरीता करण्यात आलेली असुन दि.16/06/2026 रोजी नेमणूक कालावधी संपुष्टात येणार आहे.

कुस्ती प्रशिक्षक (वस्ताद) श्री. वैभव रुपचंद माने यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.18/06/2026 ते दि.17/12/2026 पर्यंत पुढील सहा महिन्यांकरीता मुदतवाढ करणेबाबत तसेच सदर वस्ताद यांचे मानधन रु.15000/- प्रमाणे "क्रीडा पंचाचे/शिक्षकांचे मानधन/प्रोत्साहन-प्रशिक्षण देणे/आर्थिक मदत करणे/क्रीडा साहित्य् खरेदी करणे" या लेखाशिर्षातुन अदा करणेसाठी E-239674 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

तरी कुस्ती प्रशिक्षक (वस्ताद) श्री. वैभव रुपचंद माने यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.18/06/2026 ते दि.17/12/2026 पर्यंत पुढील सहा महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यास मा. स्थायी समितीची मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

**(स्वप्निल सावंत)**
**उप-आयुक्त (क्रीडा विभाग)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. 3 / ८ /२०२६

## //गोषवारा//

**प्रकरण क्र. :** ८२

**विषय : औषध फवारणी कर्मचारी पुरवठा करणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसुची "ड" प्रकरण ५(२)(२) अन्वये मे. ओम साई सिक्युरिटी ॲण्ड फॅसिलिटी मॅनेजमेंट यांना देणेबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता औषध फवारणी कामगार पुरवठा करणेकामी मा. महासभेने दि.२३/०६/२०२१, ठराव क्र.२० अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजूरी दिलेली होती. त्या अनुषंगाने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन ई-टेंडरद्वारे दि.२०/१२/२०२२ रोजी फेरनिविदा मागविण्यात आल्या होत्या.

तसेच मा. प्रशासकीय ठराव क्र.२९०, दि.०८/०३/२०२३ रोजी निविदेच्या दरास मंजुरी देण्यात आली व दि.२०/०३/२०२३ रोजी मे. स्वामी समर्थ सिक्युरिटी ॲण्ड हॉस्पिटेलिटी प्रा. लि. यांना दि.०१/०४/२०२३ पासून एकूण १२० औषध फवारणी कामगारांचा पुरवठा करणेकरीता कार्यादेश देण्यात आला. तसेच मा. आयुक्त तथा प्रशासक यांची दि.२६/०७/२०२४ रोजीच्या मान्यतेनुसार व मा. प्रशासकीय ठराव क्र.१०२, दि.०८/०८/२०२४ रोजीच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेनुसार दि.२५/०९/२०२४ पासून ३० औषध फवारणी कामगारांचा पुरवठा करणेस कार्यादेश देण्यात आला होता.

मे. स्वामी समर्थ सिक्युरिटी ॲण्ड हॉस्पिटेलिटी प्रा. लि. यांच्या कार्यादेशाची मुदत दि.३१/०३/२०२६ रोजी संपली आहे. परंतु सदर ठेकेदाराचे काम असमाधानकारक असल्याने तसेच, वेळोवेळी देण्यात आलेल्या नोटीसीनुसार पुर्तता न केल्याने तसेच कामगारांना वेतन प्रत्येक वेळी उशिराने अदा करणे, सुरक्षा साहित्य तसेच युनिफॉर्म न देणे, कामामध्ये अनियमितता तसेच काम समाधान कारक नसल्याने मे. स्वामी समर्थ सिक्युरिटी ॲण्ड हॉस्पिटेलिटी प्रा. लि. यांना आजमितीपर्यंत एकुण १९ नोटीस देण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी वेतन वेळेवर न दिल्याबाबत १२ नोटीस दिलेल्या आहेत. व २ नोटीस सुरक्षा साहित्य व गणवेश न दिल्याबाबत, त्यांची विलंबाने पुर्तता केलेली आहे. ३ नोटीस मुद्रांक शुल्क न भरलेबाबत, २ नोटीस सिक्युरीटी डिपोजिट (बँक गॅरेन्टी) अश्या एकुण ५ बाबींची पुर्तता अद्यापही करण्यात आलेली नाही. तसेच मे. स्वामी समर्थ सिक्युरिटी ॲण्ड हॉस्पिटेलिटी प्रा. लि. यांचा ठेका दि.३१/०३/२०२६ रोजी संपला असल्याने त्यांना मुदतवाढ न देता औषध फवारणी कामगार ठेका पद्धतीने पुरवठा करणेकरीता मा. स्थायी समिती सभेच्या मंजुरीच्या दिनांकापासून नवीन निविदा काढून कार्यादेश देईपर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची "ड" प्रकरण ५(२) (२) अन्वये मे. ओम साई सिक्युरिटी ॲण्ड फॅसिलिटी मॅनेजमेंट यांना १५० औषध फवारणी कामगार ठेका पद्धतीने पुरवठा करणेकरीता कार्यादेश देऊन ठेका चालविण्यासाठी नियुक्ती करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस मा. स्थायी समिती सभेच्या निर्णयास्तव सादर.

(कविता बोरकर)
**उपायुक्त (सार्व. आरोग्य)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# पशूसंवर्धन विभाग
## मा.स्थायी समिती सभा दि. ३ / ७ /२०२६
## गोषवारा

**प्रकरण क्रमांक :- (43) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या श्वानांचे/ मांजराचे मृत शरीराची विल्हेवाट लावणेसाठी पशुसंवर्धन विभागाकरिता नविन रुग्णवाहिका (Mobile Van) महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळ नाव https://gem.gov.in वरुन थेट खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या श्वानांचे मांजराचे व जनावरांचे मृत शरीराची विल्हेवाट लावणेसाठी पशुसंवर्धन विभागाकरिता नविन रुग्णवाहिका (Mobile Van) महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळ https://gem.gov.in वरुन थेट खरेदी करणे आवश्यक आहे.

सदर कामी अंदाजे रु.20.00 लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन 2026-27 करीता लेखाशीर्ष "मोकाट कुत्र्यांचा / इतर प्राण्याचा बंदोबस्त निर्बीजीकरण" यात उपलब्ध असलेल्या रु.6,50,00,000/- इतक्या तरतुदीतुन खर्च करता येईल.

मिरा भाईंदर महानगरपालिका मोकाट कुत्र्यांचा इतर प्राण्याचा बंदोबस्त निर्बीजीकरण मधील प्रस्ताव क्र.13464 दि.29/04/2026 रोजीने आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सन 2026-27 प्रत्यक्ष / सुधारित दायित्व रक्कमेचा प्रस्ताव प्राप्त करुन घेतलेला आहे. सदरकामी "मोकाट कुत्र्यांचा इतर प्राण्याचा बंदोबस्त निर्बीजीकरण" या लेखाशिर्षात उपलब्ध रु.6,50,00,000/- शिल्लक आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या श्वानांची/मांजराची मृत शरीराची विल्हेवाट लावणेसाठी पशुसंवर्धन विभागाकरिता नविन रुग्णवाहिका (Mobile Van) खरेदी करणेकामी तसेच विमा, हॅन्डलिंग चार्जेस, रजिस्ट्रेशन चार्जेस, टाईम टॅक्स कर (RTO चार्जेस) व अंतर्गत बदलावासाठी अंदाजे रु. 20.00 लक्ष इतक्या खर्चास मा.प्रस्ताव तपासणी समितीने दि.12/05/2026 रोजीने मान्यता दिलेली आहे. तरी सदरील महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळ https://gem.gov.in वरुन नविन रुग्णवाहिका (Mobile Van) थेट खरेदी करण्यास प्रस्तावास मा. स्थायी समिती मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**(स्वप्निल सावंत)**
**उप-आयुक्त (पशुसंवर्धन)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने)**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // मालमत्ता व्यवस्थापन विभाग //

## मा. स्थायी समिती सभा दि. 3 / ४/2026

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक. ( ४८ ) :-** मिरारोड (पुर्व) येथील खोजा समाज टफनभुमी (कब्रस्तान) नि:शुल्क दैनंदिन संचलन, देखभाल करणेकरीता निविदेस मान्यता देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खोजा समाजाच्या दफनभुमीचे मोफत देखभाल व संचलन करण्यासाठी संस्थेची नेमणुक करण्याकामी दि.13/04/2026 रोजी 1) साप्ता. सुरजप्रकाश व 2) दै. सिटी न्युज मुंबई या दोन वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कामाकरीता खालील संस्थांनी निविदा सादर केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | संस्थेचे नाव |
|---|---|---|
| 1 | मिरारोड (पुर्व) येथील खोजा समाज दफनभुमी (कब्रस्तान) नि:शुल्क दैनंदिन संचलन, देखभाल करणेबाबत. | मे. नवयुवान को.ऑ.हौ.सो. |
| | | मे. मिरा ग्रीन व्हु को.ऑ.हौ.सो.लि. |
| | | मे. डेल्टा गार्डन को.ऑ.हौ.सो.लि. |

वरीलकामी 1) मे. नवयुवान को.ऑ.हौ.सो. 2) मे. मिरा ग्रीन व्हु को.ऑ.हौ.सो.लि., 3) मे. डेल्टा गार्डन को.ऑ.हौ.सो.लि. या तीन संस्थांच्या निविदा प्राप्त झाल्या असून सदर संस्था पात्र आहेत. त्यापैकी मे. नवयुवान संस्थेने यापुर्वी खोजा समाज दफनभुमीचे मागील सहा वर्षांपासून चांगल्याप्रकारे देखभाल, निगा व दुरूस्तीचे काम केले आहे. तसेच त्यांच्या संस्थेबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार नसुन सदर संस्थेस नमुद कामाचा चांगला अनुभव आहे. सदर संस्थेस मनपाकडून सदर कामास कोणतीही रक्कम देण्यात येणार नाही.

त्यानुसार मिरारोड (पुर्व) येथील खोजा समाज दफनभुमी (कब्रस्तान) मे. नवयुवान को.ऑ.हौ.सो. यांना पुढील तीन वर्ष मुदतीसाठी नि:शुल्क दैनंदिन संचलन, देखभालीसाठी देण्यास शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**<u>मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.</u>**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**उद्यान विभाग**

**मा. स्थायी समिती सभा दि. ३ /७/२०२६**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ८५ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करुन २.५ वर्ष कालावधी करीता निगा देखभाल करणेकामी ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या निविदेस मान्यता मिळणेबाबत. (Tender I.D २०२६_MBMC_१३०२६५३_१)**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करुन ०३ वर्ष निगा व देखभाल करणे कामी प्रत्येक वर्षी ०१ कोटी असे ०३ वर्षा करीता रु.३.०० कोटी खर्चास तसेच निविदा मागविणेस मा. विशेष महासभा ठराव क्र.३२ दि.२७/०३/२०२६ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तथापि मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करून २.५ वर्ष कालावधीकरिता निगा देखभाल करणे आवश्यक आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करून २.५ वर्ष कालावधीकरिता निगा देखभाल करणे कामाचे रु.२,९९,९५,३३९/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करून शहर अभियंता यांनी दि.३०/०४/२०२६ रोजी तांत्रिक मंजुरी दिलेली आहे. त्याकरिता अंदाजे रु.२,९९,९५,३३९/- खर्च आवश्यक असुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करुन २.५ वर्ष कालावधी करीता निगा देखभाल करणेकामी ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने मागविणेकामी दि.१२/०५/२०२६ रोजी मा.आयुक्त सो. यांनी मान्यता देण्यात आलेली होती.

त्यानुसार दि.१४/०५/२०२६ ते २२/०५/२०२६ या कालावधीत दै.जनतेचे जनमत व सा.लक्ष्यधारी वृत्तपत्रात व NIC च्या संकेतस्थळावर जाहिर निविदा सुचना प्रसिध्द केल्या असता ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत प्राप्त ०४ निविदांच्या कागदपत्रांची पडताळणी मा.निविदा समितीसमोर करून पात्र ०३ निविदाधारकांची Financial Bid उघडणेस दि.१६/०६/२०२६ रोजीची मा.निविदा समितीची शिफारस व मा.आयुक्त सो यांच्या दि.१७/०६/२०२६ रोजीच्या मान्यतेने सदरकामाची Financial Bid दि.१९/०६/२०२६ रोजी उघडली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| Description | Rates (including all taxes) | | | |
|---|---|---|---|---|
| | मे.अॅस्थेस्टिक लॅण्डस्केपिंग | मे.निसर्गलॅण्ड स्केप प्रा.लि. | **मे.शितल लॅण्डस्केपींग अॅण्ड अॅग्रो सर्व्हिसेस** | **मे.शितल लॅण्डस्केपींग अॅण्ड अॅग्रो सर्व्हिसेस वाटाघाटी अंतीचे दर** |
| मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करुन २.५ वर्ष कालावधी करीता निगा देखभाल करणे.<br>(अंदाजे खर्च रु.२,९९,९५,३३९/-)<br><br>Providing on site required variety of flowering/foliage tree.<br>**Specification:-** Minimum Girth 8 to 10 c.m. Minimum 5 to 6 Branches with Maximum number of Leaves ,clear trunk, well Developed Canopy,Healthy conditionFree from pest and diseases,well seteled in appropriate size of Plybag,uniform in size and root system are undamaged. Bag size- 18"x18" , Height of plant- 8-10 ft.<br><br>**Eg.** Bhava,Bakul,Bottle brush, Kadamb, Kanchan, Largesstroemea,Nilmohor,Sita Ashok, Sonmohor/ peltophorum, Spathodia, Tabebuia, Anola,Arjuna,Deshi Badam, Filicium/ Fern Tree, KaduNeem, Karanj,Peepal,Putanjiva,Silver Oak Wad / banyan | रु.३,०८,९५,१९९.१७<br>(+) 3.00% | रु.३,११,९५,१५२.५६<br>(+) 4.00% | **रु.३,०२,९५,२९२.३९**<br>**(+) 1.00%** | **Below Estimate**<br>**(-०.५०%)**<br>**रु.२,९८,४५,३६२.३०** |

उपरोक्त प्रमाणे निविदा दर सुचीमध्ये मे.शितल लॅण्डस्केप ॲण्ड ॲग्रो सर्व्हिसेस (L१) यांची कमी दराची निविदा प्राप्त झाली असून सदर दरामध्ये वाटाघाटीअंती वरील प्रमाणे दर कमी केलेले असून मे.शितल लॅण्डस्केप ॲण्ड ॲग्रो सर्व्हिसेस यांची वाटाघाटाअंती कमी दराची निविदा स्विकारण्यास मा.निविदा समितीने दि.१९/०६/२०२६ रोजी शिफारस केलेली असून सदरकामी मे.शितल लॅण्डस्केप ॲण्ड ॲग्रो सर्व्हिसेस यांच्या निविदेस मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेकरिता नगरसचिव यांचेकडे गोषवारा सादर करण्यास मा.आयुक्त यांनी दि.२१/०६/२०२६ रोजी मान्यता दिलेली आहे.

त्याकामी सन २०२६-२७ च्या "वृक्षारोपण/सामाजिक वनीकरण / निसर्ग उद्यान/ पुर्न: रोपण करणे" या लेखाशिर्षामध्ये रु.१००.०० लाख तरतूद करण्यात आलेली आहे तसेच सदरकामी अंदाजे रु.२,९८,४५,३६२/- खर्च आवश्यक आहे. तसेच "झाडे खरेदी" या लेखाशिर्षामध्ये रु.१००.०० लाख तरतूद करण्यात आलेली आहे. या लेखाशिर्षामधूनही खर्च करण्यात येणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करुन २.५ वर्ष कालावधी करीता निगा देखभाल करणेकामी मे.शितल लॅण्डस्केप ॲण्ड ॲग्रो सर्व्हिसेस (L१) यांच्या निविदेस व त्याकामी येणाऱ्या रु.२,९८,४५,३६२/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(कविता बोरकर)
**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. २३/०६/२०२६ वेळ दु. २.३०
रजिस्टर नोंद अ. क्र. ५३ वर्ष २६-२७
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

**मा.स्थायी समिती सभा दि. ३ / ७ /२०२६**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. ( ८६ ):- मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विविध विभाग व सन्मा. पदाधिकारी यांच्या मार्फत होणाऱ्या विकास कामांची, कार्यक्रमांची जनजागृती करणे, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी करणे व इतर सेवा (IECActivity) घेणेकामी होणाऱ्या कामाचे अवलोकन करणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विविध विभाग व सन्मा. पदाधिकारी यांच्या मार्फत होणाऱ्या विकास कामांची, कार्यक्रमांत्री जनजागृती व्यापक स्तरावर करून शहरातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचवणे आवश्यकता आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विविध विभाग व सन्मा. पदाधिकारी यांच्या मार्फत होणाऱ्या विकास कामांची, कार्यक्रमांची जनजागृती करणे, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी करणे व इतर सेवा (IEC Activity) घेणेकामी मिरा भाईंदर महानगरपालिका mbmc.gov.in या संकेतस्थळावर, नोटीस बोर्डावर व दै. जनतेचे जनमत व साप्ता. सिंधु वैभव या वृत्तपत्रात जा.क्र.मावज/जावक/१८/२०२६-२७ दि.२१/०४/२०२६ रोजी जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार याकामी एकूण तीन दरपत्रके प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दरपत्रक धारकांनी दरपत्रकात सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Description | M/s. Dolphins Group Rates in Rs per month (L१) | M/s. Aditya Infotech Rates in Rs per month (L२) | M/s. Bliez Play Infinite Rates in Rs per month (L३) |
|---|---|---|---|---|
| १. | ▪ FacebookProfile/Page Management<br>▪ Instagram Page Management<br>▪ Twitter/X Management<br>▪ YouTube Channel Management<br>▪ WhatsApp Broadcast & Groups<br>▪ Daily Post<br>▪ Posters<br>▪ Flyers<br>▪ Infographics<br>▪ Digital banners<br>▪ Banner & Hoarding Designs<br>▪ E-newsletters<br>Event invitations<br>▪ Awareness creative<br>▪ PPT/Motions<br>▪ Program Announcement,<br>▪ LED Back drop designs (Still/ Motions)<br>▪ Print Material etc<br>▪ Reels & short videos<br>▪ Informational videos<br>▪ AV's<br>▪ Documentry style clips<br>▪ Scheme awareness videos<br>▪ Voice over & Jingles<br>▪ Event highlights<br>▪ Blog posts<br>▪ Press note drafts<br>▪ Social media captions<br>▪ Script writing | रू. २,७५,०००/- | रू. ४,००,०००/- | रू. ४,८०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ▪ Public Awareness Campaigns with Influencers & Public Figures.<br>▪ Ad Run & Boostings<br>▪ One Photographer with latest Digital Camera to MBMC office(Per month)<br>▪ LED Van Awareness (creative/ video)<br>▪ Facebook, Instagram and Twitter/X Pages will be verified. (blue tick) | | | |
| २. | Additional Photographer with Camera to office Bearer<br>Rate Per Month **२५,००० x ४** | रू. **१,००,०००/-** | रू. १,३०,०००/- | रू. १,४०,०००/- |
| ३. | FB Live with All Live setup for Event<br>Per Event /Per Day | रू. **२५,०००/-** | रू. ३५,०००/- | रू. ३०,०००/- |
| ४. | YouTube Live with All Live setup for Event<br>Per Event /Per Day | | | |
| ५. | Drone Shoot for Event<br>Per Shoot /Per Day | रू. **१०,०००/-** | रू. १८,०००/- | रू. १८,०००/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता M/s. Dolphins Group यांच्या L1 दरपत्रकास मा. आयुक्त सो. यांची दि. १५/०५/२०६ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर कामी १० लाख खर्च अपेक्षित आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३(ड) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विविध विभाग व सन्मा. पदाधिकारी यांच्या मार्फत होणाऱ्या विकास कामांची, कार्यक्रमांची जनजागृती करणे, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी करणे व इतर सेवा (IEC Activity) घेणेकामी होणाऱ्या खर्चाचे अवलोकन करणेस शिफारस करण्यात येत आहे.

**(स्वप्निल सावंत)**
**उपायुक्त (माहिती व जनसंपर्क)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. १२/०६/२०२६ वेळ ______
रजिस्टर नोंद अ. क्र. ५० वर्ष २६-२७
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका